क्रमांक: जमीन-२६८ /११२३५५/१५०६[ग१]
त.इ.१०३४/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १६ एप्रिल, १९९१

विषय:- जमीन: मुंबई उपनगर जिल्हा
मानखुर्द बेलापूर रेल्वे
मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टसाठी
मानखुर्द व मंडाळा येथील जमीन दिल्याबाबत

पहा:- १] शासन ज्ञापन, म. व व. वि. क्र. जमीन-२६८५/११२३५५/१५०६/ग१ दि. ७.१.१९८६
२] शासन, ज्ञापन, म. व वनवि. क्र. जमीन-२६८५/११२३५५/१५०६/ग१, दि. १३.१२.१९८८

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे यांना त्यांच्या क्रमांक-सी-३५/३७/२-यो/अ-१३६, दि. १४.२.१९९० च्या वरील विषय संबंधीच्या पत्राच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२६८५/११२३५५/ग८[२], दि. ७.१.१९८६ अन्वये खालील तपशीलाची जमीन खाली अटी व शर्तीवर तसेच प्रश्नांकित जमिनीचे त्यावेळी मूल्यांकन केले गेले नसल्याने प्रश्नाधीन जमिनीची कब्जेहक्काची किंमत आकारण्याचे राज्य शासनाने ठरविल्यास कब्जेहक्काची किंमत जमिनीचा प्रत्यक्ष ताबा मिळाल्या दिवसापासून व्याजासह भरण्यास मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट यांची मान्यता राहील असे हमीपत्र घेण्यात यावे या अटीवर मंजूरी दिली होती.

जमिनीचा तपशील:-

| गांव | स.क्र. | न.भू.क्र. | क्षेत्र [चौ. मी.] |
|---|---|---|---|
| अ] मानखुर्द | -- | ७ भाग | २५९५.९ |
| मानखुर्द | १३८ भाग | ८ भाग | २४४१.५ |
| मंडाळा | ८० भाग | ६ भाग | १२५४५४.५ |
| मंडाळा | ८७ भाग | -- | ९०५६.८ |
| मंडाळा | वाडी जमीन-- | | १२९०५.३ |
| | | | १,५२,४५५.०० चौ. मी. |

ब] पनवेल रोड पैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेस १,७२९.७० ऑक्ट्राय नाका व ट्रक टर्मिनलसाठी दिलेल्या २,७५४.०० जमिनीपैकी
४,४८३.७०

[एकूण[अ+-ब]= १,५६,९३८.७० चौ. मी.

....२/=

त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिलेल्या
निर्देशानुसार, भूमी अभिलेख यांच्यामार्फत वरील नकाशातील "अ" येथील जमिनीचा आगाऊ
ताबा रेल्वे प्रशासनाला दि. ६.६. १९८९ ला तर "ब" येथील जमिनीचा आगाऊ
ताबा मानखुर्द बेलापूर रेल्वेसाठी मेट्रोपॉलिटन रेल्वे ऑथॉरिटी यांना दि.
रोजी दिला आहे. या कार्यवाहीस शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र.
जमीन-२६८५/११२३५५/[१५०६]ग८, दि. १३.१२.१९८८ ला शासनाने कार्योत्तर
मंजूरी दिली आहे. उपरोक्त नकाशातील जमिनीचे मूल्यांकन ठरवून सदर रक्कम
त्या त्यांचे वसूल करणे ह्या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

२. याबाबत शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टसाठी मानखुर्द व मंडाळा येथील नकाशातील जी जमीन मेट्रोपॉलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट रेल्वे यांना आगाऊ ताबा देण्याबाबत शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२६८५/११२३५५/[१५०६]ग८, दि. १३.१२.१९८८ अन्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली आहे, त्या जमिनीचे मूल्यांकन प्रति चौ.मी. ला रु. ३००/-[तीनशे रुपये फक्त] असे ठरविण्यात यावे, आणि ही रक्कम, जमिनीचा ताबा दिल्याच्या तारखेपासून ते प्रत्यक्षात रक्कम भरेपर्यंतच्या कालावधीसाठी त्या रकमेवर दरसाल दरशेकडा ८% दराने देय ठरणाऱ्या व्याजाच्या रकमेसह मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट रेल्वे ऑथॉरिटी यांचेकडून वसूल करण्यात यावी.

३. हे शासन, वित्त विभाग यांचा अनौपचारिक क्रमांक:सोआर-३०२/ दिनांक २०.४.९० ला अनुसरून तसेच नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

स.के. आजगांवकर

[स.के. आजगांवकर]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे[पू.] मुंबई-४०००५१

प्रतिलिपी:- आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४
क्र. मुनि/मुंबई. नि. /"प"विभाग/मरे/१६८/रा.सं./९२४, दि. ४.५.१९८८ ला
अनुसरून महासंचालक संचालक, नगर रचना, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
महानगरपरिवहन, परियोजन, रेल्वे चर्चगेट स्टेशन, दुसरा मजला, मुंबई-
वित्त विभाग/व्यय-१, मंत्रालय, मुंबई.
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय
नगर विकास विभाग/नवि-१०, मंत्रालय,
निवड नस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय.

Scanned by CamScanner

क्र.सी/७५-७८/२.सी/क्र.१३५
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, ओ. एस. आर. डी. ए. इमारत,
२ रा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१
दिनांक: - 3 JUL 1991

प्रति,
कार्यकारी अभियंता (मुख्यालय)
महानगर परिवहन परि योजना (रेल्वे)
चर्चगेट स्टेशन भवन, २ रा मजला,
मुंबई ४०००२०

विषय: जमिन:मुंबई उपनगर जिल्हा
मानखुर्द बेलापूर रेल्वे
मौजे मानखुर्द व मंडाळा येथील मेट्रोपोलिटन
ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टसाठी देण्यात आलेल्या
जमिनीची कब्जेहक्काची रक्कम भरणेबाबत.

मौजे मानखुर्द व मंडाळा तालुका कुर्ला येथील खाली नमूद केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जमिनी मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट, मानखुर्द बेलापूर रेल्वे साठी मंजूर करण्यात येऊन या जमिनीचा आगाऊ ताबा आपणांस शासन ठरविल त्या कब्जेहक्काची रक्कम व ताबा दिल्यापासून सदर रक्कम भरणा करीपर्यंतच्या कालावधीवर ८% दराने व्याजासह रेल्वे प्राधिकरण शासनास भरणा करील असे हमीपत्र घेऊन देण्यात आलेला आहे.

| गावाचे नांव | : सर्वे नंबर/न.भू.क्र. | : क्षेत्र चौ.मी. | : ताबा दिल्याची तारीख. |
|---|---|---|---|
| अ. मानखुर्द | — | २५६५.९ | |
| मानखुर्द | १३८ व ८ भाग | ३४०२.५ | |
| मंडाळा | ८० भाग ६ भाग | १२५४५७.५ | ६.६.८६ |
| मंडाळा | ८७ भाग - | ९०५६.८ | - |
| मंडाळा | खाडीपैकी | १२९०५.३ | |
| | | १५२४५५.०० | |
| ब. पनवेल रोड | | ७०२९.७० | |
| येथे ऑक्ट्रॉय नाका | | २७५४.०० | 23.3.80 |
| व ट्रक टर्मिनलसाठी | | ४४८३.७० | |
| दिलेल्या जागेपैकी | | १५६९३८.७० | |

..२..

शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२८८५/११२३५५/१५०८/ ग.१/पु.क्र.१०३८/ल-३ दि.१६.७.१९९१ अन्वये उपरोक्त आगाऊ ताब्यात दिलेल्या जमिनीचे मुल्यांकन रुपये ३०० प्रती चौ.मी. इतके ठरविण्यांत आलेले आहे. या दराने उपरोक्त "अ"व"ब" मध्ये नमूद केलेल्या जमिनीची कब्जेहक्काची रक्कम व त्या रकमेवर ८% दराने ताबा दिलेल्या तारखेपासून सदर रक्कम भरणा करी पर्यन्तच्या कालावधीचे व्याज मेट्रोपोलिटन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट रेल्वे ऑथॉरिटी यांनी महाराष्ट्र शासनास भरणा करावयाचे आहे.

तरी आपणांस विनंती करण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या रकमा (कब्जेहक्काची रक्कम व व्याज) या कार्यालयांत हे पत्र मिळाल्यापासून ८ दिवसांत भरणा कराव्या.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | (१) | उपरोक्त "अ" मध्ये नमूद केलेल्या १,५२,४५५ चौ.मी. जमिनीची प्रति चौ.मी. रु.३००/- प्रमाणे होणारी कब्जेहक्काची किंमत | रु. ४,५७,३६,५००.०० |
| | (२) | उपरोक्त कब्जेहक्काच्या किंमतीवर ८% दराने दि.६.६.८६ ते ३०.६.९१ पर्यन्त ५ वर्षे २५ दिवसांवर होणारे व्याज. | रु. १,८५,४५,२१०.६५ |
| (ब) | (१) | उपरोक्त "ब" मध्ये नमूद केलेल्या ४४८३.७० चौ.मी. जमिनीची प्र.चौ.मी. रु.३०० प्रमाणे होणारी कब्जे हक्काची रक्कम रुपये. | रु. १३,४५,११०.०० |
| | (२) | उपरोक्त रु.१३,४५,११०/- कब्जे हक्काच्या किंमतीवर ८% दराने २७.३.८७ ते ३०.६.९१ पर्यन्त ४ वर्षे ३ महिने ५ दिवसांचे व्याज. | रु. ४,५८,८११.५० |
| | | एकूण भरणा करावयाची रक्कम. | रु. ६,६०,८५,६३२.१५ |

उपरोक्त रक्कम रु.६ कोटी ६० लाख ८५ हजार सहाशे बत्तीस व पैसे पंधराकेवळ या कार्यालयात भरणा केल्यानंतर जमीन प्रदान आदेश निर्गमित करण्यांत येतील.

सही

जिल्हाधिकारी, मु.उ.जि.

प्रत: तहसिलदार कुर्ला/ नगर भूमापन अधिकारी क्र.१, मुलुंड यांचकडे माहितीसाठी रवाना.

३१/७/९१

जिल्हाधिकारी मु.उ.जि. करिता.

मेमू.

जिल्हाधिकारी